# देवाची आध्यात्मिक कृपादाने समजून घ्या

पौल-तिमथी पुढारी प्रशिक्षण पुस्तिक S6a 'तुमच्या मंडळीकडे आध्यात्मिक कृपादाने आहेत' यामध्ये आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करण्याविषयी मुख्य मार्गदर्शन तत्वे स्पष्ट केलेली आहेत. हा अभ्यास तुम्ही अद्याप वाचला नसेल तर कृपा करुन आता वाचा.

## 1. आध्यात्मिक कृपादानांविषयी तपशीलाने सांगणारे पवित्र शास्त्रातील उतारे पाहा.



नव्या करारातील पत्रे प्रकट करतात की देव सर्व ख्रिस्ती विश्वासणायांना एकमेकांची सेवा करण्यासाठी विशेष क्षमता-सामर्थ्य पुरवतो. देव अशा काही व्यक्तिमंडळयांकडे बक्षिस म्हणून पाठवतो.

**1 पेत्र 4:10 व 11** मध्ये देव विश्वासणायांना देत असलेल्या कृपादानांचे दोन मुख्य प्रकार पाहा.

''प्रत्येकाला जसे कृपादान मिळाले आहे तेसे देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कारभूायांप्रमाणे ते एकमेकांच्या कारणी लावा, भाषण करणूायाने आपण देवाची वचने बोलत आहो असे बोलावे, सेवा करणूायाने, ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करीत आहो. अशी करावी, ह्यासाठी की, सर्व गोष्टीत देवाचे गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावे, गौरव व पराक्रम ही युगानुयुग त्याची आहेत. आमेन''

*(उत्तर : पेत्राने नमूद केलेल्या दोन मुख्य कृती अशा आहेत.*

1. **बोलणे** *(देवाचे सत्य इतरांना सांगणे)*
2. **सेवा करणे** *(इतरांना देवाची प्रीती कृतीतून दाखवणे)*

**इफिस 4:10-12** ही वचने सांगतात की विविध प्रकारच्या सेवाकार्यांसाठी विश्वासणायांना सुसज्ज करण्याकरीता देव मंडळयांनाही काही लोक देतो. पाहा **इफिस 4:11** मध्ये कृपादाने मिळालेले पाच प्रकारचे लोक.

''आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तीक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले, ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरिता सिद्ध करावे.''

*(उत्तर : ह्या पाच प्रकारच्या लोकांची यादी पुढे दिली आहे)*

1. **प्रेषित** (हे मंडळया रोपण करीत)
2. **संदेष्टे** (ह्यांनी देवाचे सत्य संदेशातून सांगितले)
3. **सुवार्तिक** (हे सुवार्ता सांगत)
4. **पाळक** (हे मंडळयांची देखभाल करुन काळजी घेत)
5. **शिक्षक** (हे देवाच्या आज्ञा पाळण्यासाठी इतरांना साहाय्य करीत).

रोम 12 मध्ये शिकवले आहे की योग्य दृष्टीकोनातून इतरांची सेवा करण्यासाठी विश्वाणायांना आध्यात्मिक कृपादाने दिलेली आहेत. पाहा रोम 12: 6-8 ह्या वचनामध्ये काही विश्वासणायांना मिळणाया आध्यात्मिक कृपादानांची सात उदाहरणे दिली आहेत.

''आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगावयाचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा, सेवा करितांना सेवेत तत्पर असावे, शिकवणूायांने शिक्षण देण्यात, बोध करणूायांने बोध करण्यात तत्पर असावे दान देणूायाने ते औदार्याने द्यावे, अधिकूायाने आपले काम आस्थेने करावे, दया करणूायाने ती संतोषाने करावी.''

(उत्तर : सात प्रकारच्या कृपादानांची यादी पुढे दिली आहे).

1. **संदेश सांगणे** (1 करिंथ 14:3 व 24 मध्ये सांगितल्या प्रमाणे एकमेकांना देवाचे सत्य सांगणे).
2. **सेवा करणे** (यालाच 1 करिंथ 12:28 मध्ये 'व्यवस्था पाहणारे' असे म्हटले आहे).
3. **शिक्षण देणे** (विश्वासणूायांना एकमेकांची सेवा करण्यासाठी सुसज्ज करणे.)
4. **बोध करणे** (प्रोत्साहन देऊन सुधारणा करणे)
5. **उदारपणे दान देणे.**
6. **आस्थेने काम करणे** (मंडळया किंवा सेवाकार्यांची सुरुवात करणे किंवा देखरेख करणे आणि विश्वासणूायांना एकदिलाने काम करायला लावणे).
7. **दया करणे,** ती आनंदाने मनापासून करावी.

शरीर ह्या नात्याने निरनिराळया कृपादानांचा कशा प्रकारे उपयोग करायचा हे 1 करिंथ 12 मध्ये दाखवले आहे. वर नमूद न केलेली आणखी कृपादाने 1 करिंथ 12:8-10 व 28 मध्ये दिली आहेत ती पाहा.

''कारण एखाद्याला आत्म्याच्या द्वारे ज्ञानाचे वचन मिळते एखाद्याला त्याच आत्म्यानुसार विद्येचे वचन. एखादयाला त्याच आत्म्यात विश्वास, एखाद्याला त्याच एका आत्म्यात निरोगी करण्याची कृपादाने, एखादयाला अद्‌भुत कार्ये करण्याची शक्ति, एखाद्याला संदेश देण्याची शक्ती एखाद्याला आत्मे ओळखण्याची शक्ती एखाद्याला विशेष प्रकारच्या भाषा बोलण्याची शक्ती व एखाद्याला भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ती मिळते.'' (1 करिंथ 12: 8-10).

''तसे देवाने मंडळीत कित्येकांना नेमले आहे, प्रथम प्रेषित, दुसरे संदेष्टे, तिसरे शिक्षक, शिवाय अद्‌भुत कृत्ये करणारे, निरोगी करण्याची कृपादाने मिळालेले, विचारपूस करणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्नभिन्न भाषा बोलणारे असे नेमले आहेत'' (12:28)

*(उत्तर : 1 करिंथ 12 मध्ये नमूद केलेली इतर आध्यात्मिक, भविष्य संदेश विषयक कृपादाने पुढील प्रमाणे.*

**ज्ञानाचे वचन** (देवाचे सत्य आचरणात आणण्यास इतरांना मदत करणे)

**विद्येचे वचन** (देवाचे सत्य समजून घेण्यासाठी इतरांना मदत करणे)

**भाषा बोलण्याची शक्ती** (अन्य-विशेष भाषांमध्ये प्रार्थना करणे, गाणी गाणे किंवा भविष्यसंदेश सांगणे).

**भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ती** (एखाद्याच्या विशेष भाषेचा अर्थ उलगडून सांगणे)

(1 करिंथ 12 मधील इतर आध्यात्मिक, सेवेसंबंधीची कृपादाने याप्रमाणे.

**विश्वास** (देव त्याने दिलेली अभिवचने पूर्ण करील असा दृढ विश्वास)

**निरोगी करण्यांची कृपादाने** (आजाूयांना आरोग्य मिळावे यासाठी देवाची प्रार्थना करणे).

**अद्‌भुत कृत्ये** (देवाने लोकांच्या गरजा पुरवाव्यात याकरीता प्रार्थना करणे)

**आत्मे ओळखण्याची शक्ती** (दुष्ट आत्मे आणि त्यातून तयार होणारी फसवणूकीची आध्यात्मिक वृत्ती ओळखणे).

**व्यवस्था पाहणे** (प्रकल्पांची व्यवस्था पाहणे आणि तपशीलांचा समन्वय साधणे)

विशेष भाषा बोलण्याची आणी सेवा करण्याची काही कृपादाने असामान्य असतात आणि केव्हा केव्हा ती देवाच्या सामर्थ्याची चिन्हे प्रतिके असतात. यामुळे लोकांना विश्वास ठेवण्यास मदत होते. अशा चिन्हांच्या कृपादानामध्ये विशेष भाषा बोलणे (1 करिंथ 14:22), ह्या भाषांचा अर्थ सांगणे, निरोगी करणे आणि निरनिराळे अद्‌भुत चमत्कार ह्यांचा समावेश होतो.

नव्या करारातील काही कृपादाने आध्यात्मिक आहेत असे स्पष्टपणे सांगितलेले नसले तरीही पुढील गोष्टी कृपादाने आहेत असे काही शिक्षकांचे मत आहे.

**ब्रह्मचर्य**(विवाह न करता शुद्धाचरण व संयम बाळगणे, मत्तय 19:10)

**विवाह** (1 करिंथ 7:7)

**पाहुणचार** (रोम 12:13)

**रक्तसाक्षी होणे** (सुवार्ता प्रसाराच्या कारणासाठी ठार मारले जाण्याची कृपा होणे, प्रकटी 20:4).

यावरुन आपल्याला असे अनुमान काढता येते की, देवाच्या आध्यात्मिक कृपादानांचे वर्गीकरण तीन **सर्वसाधारण गटांत** करता येते.

विश्वासणाऱ्यांना देवाचे वचन **सांगण्यासाठी** साहाय्य करणारी कृपादाने.

विश्वासणाऱ्यांना देवाचे सामर्थ्याने **सेवा करण्यास** साहाय्य करणारी कृपादाने.

देवाचे अद्‌भुत सामर्थ्य प्रकट करणारे आणि लोकांना विश्वास ठेवण्यास साहाय्य करणारी 'चिन्ह' कृपादाने.

**कसोटी :** पुढीलपैकी कोणती कृपादाने साधारणपणे वर दिलेल्या तीन गटांशी जुळणारी आहेत?

1. शिक्षण देणे
2. दया करणे
3. मदत करणे
4. बोध करणे
5. विशेष भाषा बोलणे
6. पाहुणचार करणे

*(उत्तरे : 1. सांगणे 2. सेवा करणे 3. सेवा करणे 4. सांगणे 5. चिन्ह (1 करिंथ 14:22) 6. सेवा करणे)*

देवाच्या वचनात नमूद केलेल्या आध्यात्मिक कृपादानांबरोबरच देवाला असमान्य परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या गरजांसाठी उल्लेख न केलेली कृपादाने देता येतात.

**2. आध्यात्मिक कृपादानांविषयीच्या सर्वसाधारण प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी करा.**

ह्या प्रश्नांची उत्तरे तुम्हांला माहित नसतील, तुमच्या पवित्र शास्त्रात ती कृपा करुन शोधा.

| सर्वसाधारण प्रश्न आणि गैरसमजूत | उत्तरे येथे पाहा |
|---|---|
| प्रत्येक विश्वासणाऱ्याला देवाकडून आध्यात्मिक कृपादान मिळते का? | रोम 12:6 |
| विश्वासणाऱ्याला एकापेक्षा अधिक आध्यात्मिक कुपादाने मिळतात का? | प्रे.कृ. 6:3, 8 व 10 |
| विश्वासणाऱ्याला कोणते कृपादान द्यायचे हे देव कसे ठरवतो? | 1 करिंथ 12:11 |
| प्रत्येक विश्वासणाऱ्याने विशेष भाषा बोललीच पाहिजे अशी अपेक्षा करिंथकरांना पत्र लिहिणाऱ्या प्रेषित पौलाने केली का? | 1 करिंथ 12:30 |
| वर दिलेल्यापैकी कोणती कृपादाने किंवा सद्‌गुण वडीलांच्या ठायी असले पाहिजेत? | 1 तीमथ्य 3:2 |
| सेवक त्यांच्या पवित्र शास्त्रातील जबाबदाऱ्या पार पाडत असतील तर त्यांच्या ठायी कोणते कृपादान असणे अगत्याचे आहे? | प्रे.कृ. 6:1-6 |
| आम्ही अधिक महान आध्यात्मिक कृपादाने मिळवण्याचा प्रयत्न करावा का? | 1 करिंथ 12:31 |

| | |
|---|---|
| करिंथकर विश्वासणाऱ्यांनी 'महान' आध्यात्मिक कृपादानांपैकी कोणत्या कृपादानांची उपयोग करण्याची विनंती पौल करतो? | 1 करिंथ 14:1-4 |
| नव्या करारातील भविष्य संदेश सांगण्याचा तिहेरी उद्देश्य काय आहे? | 1 करिंथ 14:3 |
| कोणत्याही आध्यात्मिक कृपादानांपेक्षा अधिक काय आहे? | 1 करिंथ 13 |

**उत्तरे.**

| | |
|---|---|
| 1. *होय* | 6. *सेवा करणे किंवा व्यवस्था पाहणे* |
| 2. *होय* | 7. *होय* |
| 3. *त्याच्या पवित्र आत्म्याच्या द्वारे* | 8. *भविष्यसंदेश उन्नती, बोध किंवा सात्वंनासाठी.* |
| 4. *नाही* | 9. *उन्नती, बोध आणि सांत्वन* |
| 5. *पाहुणचार आणि शिक्षण* | 10. *प्रीती* |

### 3. निरनिराळया आध्यात्मिक कृपादानांचे निश्चित उद्देश्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

देव सर्व विश्वासणाऱ्यांना आध्यात्मिक कृपादाने देतो. विश्वासणाऱ्यांना त्यांना कोणती आध्यात्मिक कृपादाने मिळाली आहेत हे नेहमीच माहिती असण्याची आवश्यकता नाही, पण सर्व विश्वासणाऱ्यांनी एकमेकांची प्रेमाने सेवा करणे मात्र अगत्याचे आहे (रोम अध्याय 12). काही विश्वासणारे मंडळयां मध्ये प्रशिक्षकाचे काम करतात. काही जण देवाचे वचन प्रभावीपणे सांगतात, तर इतर लोकांच्या व्यावहारिक गरजा पूर्ण करण्यास झटतात आणि आणखी काही जण अद्भुत चमत्मकार करतात.

(अ) प्रत्येक प्रकारच्या कृपादानाचा काही उद्देश असतो.

***बोलण्याचे कृपादान*** (''भविष्यसंदेश'') देवाचे सत्य सांगून लोकांना विश्वास ठेवण्यास व आज्ञापालन करण्यास साहाय्य करणे.

**शिक्षण देणे.** देवाच्या वचनाचे आज्ञापालन कसे करायचे हे शिक्षक लोकांना स्पष्ट करुन सांगतात.

**बोध करणे.** बोध करणारे लोकांना प्रोत्साहन, बळ देतात आणि त्यांची उभारणी करतात.

**विश्वास.** हे कृपादान असणारे लोक इतरांना विश्वास ठेवण्यास आणि देव त्यांच्या मंडळीला काय करण्यास मदत करीत आहे त्याचा दृष्टांत पाहण्यास, लोकांना पुढे जाण्याची प्रेरणा देतात.

***सेवा करण्याचे कृपादान*** (''सेवाकार्य'') देवाच्या सामर्थ्याने लोकांर दया करणे.

संतोषाने **दान देणे.** दान देणारे इतरांच्या भौतिक गरजा पुरवतात.

**नेतृत्व आणि प्रशासन.** पुढारी लोकांना एकत्रितपणे काम करण्यास साहाय्य करतात.

**दया करणे.** दया करणाऱ्या व्यक्ति इतरांच्या गरजा व्यावहारिक मार्गाने पूर्ण करतात.

***चिन्ह कृपादाने*** (अद्भुत चमत्कार) लोकांना विश्वास ठेवता यावा यासाठी त्यांना देवाच्या सामर्थ्याचे दर्शन घडवणे.

**आत्मे ओळखण्याचे कृपादान.** तारतम्याने विचार करणारे सत्य आणि चूक यात फरक करतात.

**आरोग्य देणे.** आरोग्य देणारे लोकांना शारीरिक किंवा भावनिक आरोग्य देतात.

**विशेष भाषा बोलणे** आणि त्याचा **अर्थ उलगडून सांगणे.** काही लोक त्यांना माहित नसणाऱ्या भाषेत बोलतात किंवा प्रार्थना करतात. आणि समजा ते लोकांशी बोलले तर त्यांचा संदेश लोकांना समजणाऱ्या भाषेत इतरांनी सांगायचा असतो.

**भविष्य संदेश.** भविष्यसंदेश सांगितला जातो तरी हे विश्वासणाऱ्यांसाठी चिन्ह आहे (1 करिंथ 12:22).

(ब) कृपादान मिळालेल्या प्रत्येक प्रकारच्या व्यक्तीला काम नेमून दिलेले असते.

बोलणाऱ्या व्यक्ती.

**संदेष्टे.** लोकांना विश्वासाकडे घेऊन जाणारे संदेश संदेष्टे देतात.

**सुवार्तिक.** येशू विषयीची सुवार्ता सुवार्तिक पुन्हा तपशीलवार सांगतात.

**शिक्षक.** येशूच्या आज्ञांचे पालन कसे करायचे याबद्दलच्या सूचना शिक्षक देतात.

सेवा करणाऱ्या व्यक्ती.

**प्रेषित.** नवीन मंडळयांची स्थापना करणे आणि त्यांचा पुढाऱ्यांना प्रशिक्षण देणे यासाठी प्रेषितांना इतर ठिकाणी पाठवले जाते.

**मेंढपाळ.** मेंढपाळ पाळक मंडळयांचे व गटांचे पुढारीपण करुन त्यांची देखभाल करतात.

(क) प्रत्येक विश्वासणाऱ्याने त्याच्या कृपादानाचा उपयोग करावा यासाठी पुढारी त्यांना साहाय्य करतात.

लोक लहान गटांमध्ये एकमेकांची सेवा करतील तेव्हा त्यांची आध्यात्मिक कृपादाने स्पष्ट पणे कळतील आणि इतरांनाही त्याची ओळख होईल. सेवा करण्यापासून नव्या विश्वासणाऱ्यांना दूर ठेवू नका.

सर्व विश्वासणाऱ्यांना एकमेकांची सेवा करण्यासाठी त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करण्यासाठी संधी उपलब्ध करुन द्या. लहान गटांमध्ये हे उत्तम प्रकारे करता येते. फक्त कुशल लोकांचेच ऐकण्या पुरतेच पवित्र आत्म्याचे कार्य मर्यादित करु नका.

विश्वासणाऱ्यांना त्यांचा आध्यात्मिक कृपादांनाचा उपयोग करतांना लोकांबद्दल प्रेम वाटणे अगत्याचे आहे याची त्यांना सतत आठवण करुन द्या. विश्वासणारे रागावतात किंवा ते प्रेमळ नसतात तेव्हा त्यांची कृपादाने लोकांना दुखावतात.

लोकांना त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांनुसार मंडळया व गटांमध्ये जबाबदाऱ्या, पदे आणि सेवा द्या, लोकांना जे कृपादान नाही त्या कामाची जबाबदारी त्यांना देऊ नका.

वडीलजनांना बोलण्याचे कृपादान तर सेवकांना सेवा करण्याचे कृपादान असणे अगत्याचे आहे.

लहान गट आणि सेवा करणारे चमू यामध्ये विविध कृपादाने असणारे सदस्य असावेत. पवित्र आत्मा त्यांच्यामध्ये योग्य ताळमेळ घालतो. एकाच प्रकारचे कृपादान असणाऱ्या व्यक्तीचा गट करणे टाळा.

विश्वसणाऱ्यांना देवाने कोणती कृपादाने दिली आहेत हे त्यांना समजण्यास मदत व्हावी यासाठी त्यांनी देवाच्या कृपादांनाचा आदर्श असणाऱ्या पवित्र शास्त्रातील व्यक्तींशी स्वत:ची तुलना करावी. पवित्र शास्त्रातील कोणत्या व्यक्तीच्या क्षमता किंवा सद्गुणांचे त्यांना नेमके अनुकरण करायचे आहे ते ठरवण्यास साहाय्य करा.

त्यांचे कथावृत्तांत्त विश्वासणाऱ्यांना सांगा आणि ते कोणत्या व्यक्तीशी चट्कन समरूप होतात व का, हे त्यांना विचारा. पुढे काही उदाहरणे दिली आहेत.

## पवित्र शास्त्रातील आदर्श

**सेवा करा,** अशा प्रकारे की नहेम्या अध्याय 3 व 6:15-16 मध्ये सांगितल्याप्रमाणे जे यरुशलेमेचे तट पुन्हा बांधण्यास धावून गेले. (तुम्हांला त्यांच्यासारखे व्हायचे आहे का?)

**दान दया,** जसे अबीगेलने दावीदाच्या गरजू पुरूषांना उदारतेने दिले, 1 शमुवेल 25(देण्याविषयी मार्गदर्शनासाठी करिंथ अध्याय 9 पहा?)

**बोधा करणे ( उत्तेजना )** जसे पौलाने इफ्रिस करातील पुढाऱ्यांना प्रेषित 20:17-38 मध्ये केल्या प्रमाणे.

**दया करणे,** चांगल्या शोमरोन्याने लूक 10:30-35 मध्ये दाखवली. हे कृपादान उपयोगात आणण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे मत्तय 25:31-46 आणि प्रे.कृ. 6:1-7.

**भविष्य संदेश,** यिर्मयाने देवाच्या लोकांना पुन्हा त्याच्याकडे येण्यास पाचारण करुन प्रेरणादायी संदेश दिले, यिर्मया अध्याय 1. ह्या कृपादानाचा उद्देश्य नव्या करारामध्ये 1 करिंथ 14:3-4 येथे पाहा.

**शिक्षण द्या,** एज्राने देवाचे नियमशास्त्र लोकांना उलगडून सांगितले, नहेम्या अध्याय 8. शिक्षण देण्यामागचा खरा उद्देश्य पाहा इफिस. 4:11-16.

**नेतृत्व करा** (सेवक पुढारीपण) मोशेने इतरांना सेवाकार्यात मदत केली आणि यहोशवाने आपल्या सैन्याचे नेतृत्व केले. निर्गम 18:13-26 आणि यहोशवा 4-6.

सूज्ञतेने मार्गदर्शन करा, जसे शलमोनाने 1 राजे 3 मध्ये केले आहे

**ज्ञान,** वस्तुस्थितीप्रमाणे काम करा, नहेम्याने तटबंदीची पाहणी केल्यावर त्याप्रमाणे काम केले किंवा बिरुयातील लोकांनी वचनाचा शोध घेतला, नहेम्या 1:11-20 आणि प्रे.कृ. 17:10-12.

**मदत.** अक्विल्ला व प्रिस्किल्लाने पौल व अपुल्लोला मदत केली तशी मदत करणे (प्रे.कृ. 18:1-5, 24-28).

**प्रेषित** म्हणून जा ('पाठवलेले' किंवा मिशनरी) योना पाण्याखाली घेतलेल्या प्रशिक्षणानंतर प्रेषित म्हणून गेला, तसेच पौल व बर्णबानेही असेच केले (प्रे.कृ. अध्याय 13-14) पौलाची मुख्य, मार्गदर्शक मिशनरी तत्वे पाहा रोम 5:20-21.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net